## मौजे हाडोळी ता. भोकर येथे 'खरीप पूर्व शेतकरी मेळावा' उत्साहात संपन्न!
## एल निनोचे संकट, संतुलित खत नियोजन आणि 'खेती बचाव अभियाना'वर शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन

"नियोजन खरिपाचे, पाऊल प्रगतीचे!" हाच ध्यास घेऊन मौजे हाडोळी (ता. भोकर) येथे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर 'खरीप पूर्व शेतकरी मेळावा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कृषी विज्ञान केंद्र (KVK), पोखर्णी, नांदेड-१ आणि 'आत्मा' कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे आणि शेती अधिक शाश्वत व्हावी, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता.

**शास्त्रज्ञांकडून मोलाचा सल्ला आणि मार्गदर्शन**

या मेळाव्यात उपस्थित कृषी शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना सद्यस्थितीतील आव्हानांना तोंड देण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला:

संतुलित खत नियोजन: डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) यांनी जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी आणि पिकांच्या जोमदार वाढीसाठी रासायनिक, सेंद्रिय आणि जैविक खतांचा संतुलित वापर कसा करावा, याविषयी तसेच

एल निनोचे संकट: बदलत्या हवामानाचा आणि 'एल निनो'चा खरीप हंगामावर काय परिणाम होऊ शकतो, तसेच कमी पावसात किंवा पावसाच्या खंडात पिके कशी वाचवायची, याचे अचूक नियोजन शेतकऱ्यांना सांगण्यात आले.

'एकात्मिक शेती पद्धती (Integrated Farming): फक्त पिकांवर अवलंबून न राहता शेतीसोबत दुग्धव्यवसाय, शेळीपालन किंवा कुक्कुटपालन करावे. यामुळे एका घटकाचा टाकाऊ पदार्थ (उदा. शेणखत, गोमूत्र) दुसऱ्या घटकासाठी (पिकांसाठी खत) वापरून खर्च शून्यावर आणता येतो.

सेंद्रिय व जैविक खतांचा वापर: रासायनिक खतांवरील खर्च कमी करण्यासाठी घरच्या घरी जीवामृत, दशपर्णी अर्क आणि कंपोस्ट खत तयार करावे. यामुळे जमिनीची सुपीकताही टिकून राहते.

रासायनिक खतांचे आरोग्यावरील दुष्परिणाम सौं. अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ) यांनी रक्ताल्पता (Anemia) ज्यामुळे अन्नातील लोह व जीवनसत्त्वे कमी झाल्यामुळे महिला व मुलांमध्ये अशक्तपणा वाढतो.पिण्याच्या पाण्यात रासायनिक घटक मिसळल्याने लहान मुलांना 'ब्लू बेबी सिंड्रोम' चा धोका निर्माण होतो. महिलांमध्ये थायरॉईड, पीसीओडी (PCOD) आणि मासिक पाळीचे विकार वाढतात. दीर्घकाळ रासायनिक अन्न खाल्ल्याने कर्करोग (Cancer), यकृत (Liver) आणि किडनीचे आजार होऊ शकतात.

केव्हीकेच्या कृषि विस्तार तज्ञ डॉ. अमिता क्षत्रिय यांनी मार्गदर्शन करताना बाजारपेठेचा अभ्यास आणि आयात-निर्यात व शेतीत महिलांची भूमिका महत्त्वाची व (PRA, Survey ) सहभागी ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण राबवून गावाची शेतीविषयक सद्यस्थिती, पीक पद्धती आणि शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्या जाणून घेण्यात आल्या.तसेच आधुनिक शेतीमध्ये सोशल मीडिया व विविध प्रसारमाध्यमांच्या प्रभावी वापराचे महत्त्व सांगितले. तसेच, शेतीशी संबंधित सर्व तांत्रिक आणि आर्थिक निर्णयांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग असणे काळाची गरज असल्याचे सांगत बाजारपेठेचा अभ्यास व आयात-निर्यात या विषयांवर महत्वपूर्ण प्रकाश टाकला.

"समृद्ध शेती, सुखी शेतकरी!" हे ब्रीदवाक्य समोर ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यामुळे हाडोळी आणि परिसरातील शेतकऱ्यांना खरिपाच्या पूर्वतयारीसाठी मोठी मदत होणार आहे.

या मेळाव्याला मौजे हाडोळी व परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विभागाचे अधिकारी, 'आत्मा'चे प्रतिनिधी आणि कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. योग्य नियोजनातूनच प्रगती साधता येते, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.















प्राथमिक शाळा
ST




ग्राम पंचायत
तलाठी सज्जा


महादेव मंदिर



